


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

विद्यार्थी कल्याण मंडळ

डॉ. संजयकुमार एन. दळवी
एम.एस्सी., पीएच.डी.
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ


अति तात्काळ

संदर्भ क्र.: विकमं/२०१४–१५/३३३ दिनांक : १९/०९/२०१४.

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय :– विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये तसेच विद्यापीठाच्या परिसरातील महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत....

संदर्भ क्र. : महाराष्ट्र शासन, युएनआय/(३८/१४)/स्वच्छतागृहे/विशि–१, दि. १८ सप्टेंबर,२०१४ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात/संस्थेच्या परिसरात महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच महिलांकरीता स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध नसल्यास सदर स्वच्छतागृहे बांधण्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याबाबतचे मा. शिक्षण सहसंचालक यांचे पत्र आपल्या अवलोकनार्थ व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

सदर स्वच्छतागृहे स्वच्छ राखण्याकरीता आऊट सोर्सिंग करण्यात येईल का? याबाबतचा अभिप्राय व याबाबतची अधिक माहिती मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ०७ यांना सोबत जोडलेल्या पत्रातील तक्त्यानुसार सॉफ्ट कॉपी Ex-cel मध्ये तात्काळ पाठविण्यात यावी, ही विनंती.

कळावे,

सोबत : वरीलप्रमाणे.

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
www.dhepune.gov.in E-Mail- dhepune@yahoo.co.in.
फोन नंबर -०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स नंबर ०२०/२६१११९५३

क्रमांक - युएनआय/(३८/१४-)/स्वच्छतागृहे/विशि-१ दिनांक- १८ सप्टे २०१४

**तात्काळ/कालमर्यादेत**

**ई-मेलव्दारे**

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय- विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये तसेच विद्यापीठांच्या परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत.**

**संदर्भ-** शासनपत्र क्र. संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४८-१४/आस्था-२, दिनांक १७ सप्टे २०१४.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये व संचालनालय तसेच सर्व विद्यापीठांच्या परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृहांच्या सुविधा करण्यात याव्यात. विद्यापीठांनी सर्व शिक्षण संस्था/महाविद्यालयांसाठी स्वच्छतागृहे बांधण्याबाबत संबंधितांना कळवावे व स्वच्छतागृह स्वच्छ राखण्यासाठी आऊट सोर्सिंग करता येईल का? याबाबतची माहिती मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना उपलब्ध करुन द्यावयाची आहे. सोबत शासन पत्राची प्रत अवलोकनास्तव जोडण्यात येत आहे.

खालील मुद्यांच्या आधारे आपल्या विद्यापीठ परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृहांच्या सुविधांबाबत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

| अ.क्र. | महिला प्रवर्गाचा तपशिल. (संख्या) | स्वच्छतागृहांची संख्या | स्वच्छ करण्यासाठी नियुक्त कर्मचा-यांची संख्या.(नियमित असल्यास) | आऊट सोर्सिंगव्दारे |
|---|---|---|---|---|
| १. | महिला अध्यापक | | | |
| २. | महिला अध्यापकेत्तर कर्मचारी | | | |
| ३. | विद्यार्थिनी | | | |

महिला स्वच्छतागृहाचे प्रमाण ५० महिला/विद्यार्थिनीसाठी ०१ हे प्रमाणभूत मानावे.

महिला अध्यापक व कर्मचारी यांची सध्याची संख्या गृहित धरावी.

१. विद्यापीठ परिसरामध्ये महिला अध्यापक अध्यापकेतर व विद्यार्थिनी यासाठी स्वच्छतागृहांची सुविधा वरील निकषानुसार पुरेशा प्रमाणात आहे का?

२. नसल्यास, त्याठिकाणी निकषानुसार स्वच्छतागृह बांधण्याबाबत नियोजन करण्यात यावे व केलेले नियोजन या कार्यालयास अवगत करावे.

३. विद्यापीठातील स्वच्छतागृहे स्वच्छ राखण्यासाठी विद्यापीठात कोणती कार्यपध्दती अवलंबली जाते.

४. स्वच्छतागृहे स्वच्छ राखण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्यास आऊट सोर्सिग व्दारे व्यवस्था करता येईल का?

५. स्वच्छतागृहे पुरेशी असणे व स्वच्छ असणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.

उपरोक्त माहिती निश्चितपणे दि.१९ सप्टेबर २०१४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत संचालनालयाच्या ई-मेलवर उपलब्ध करुन देण्यात यावी.

मा.प्रधान सचिव यांचे विषयांकित निर्देश विचारात घेता निश्चित स्वरुपाची अचूक माहिती कालमर्यादेत उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही करावी.

18/9/14

(डॉ.वि.रा.मोरे)
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत - मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.